चांदा ते बांदा योजने अंतर्गत "असोलामेंढा" प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून पाईपलाईनद्वारे मूल तालुका, जिल्हा चंद्रपूर मधील चिंचाळा व लगतच्या ६ गावांना कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे. या कामाला "सुधारीत प्रशासकीय मान्यता" देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : चांबायो २०१९/प्र.क्र.२/का.१४१८
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ११ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u>: १) नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. डिएपी:१०१६/प्र.क्र.२९६/का.१४८१, दिनांक. २९/११/२०१६
२) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र जावक क्रमांक:-जिप्रव्यक/का-१५/कास-२/चांबांयो / २०१८/३२, दिनांक ७/१२/२०१८
३) वित्त विभाग यांचे पत्र क्रमांक - व्यअस-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-२, दिनांक ५/९/२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

चांदा ते बांदा योजनेअंतर्गत "असोलामेंढा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून पाईपलाईनद्वारे मूल तालुका, जिल्हा चंद्रपूर मधील चिंचाळा व लगतच्या ६ गावांना "कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे," या कामाला नियोजन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २९/११/२०१६ अन्वये एकूण रु. २३.४७ कोटी इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या कामाकरीता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या दि. ०७/१२/२०१८ च्या प्रस्तावानुसार अधिक दराची निविदा मंजूर झाल्यामुळे खर्चामध्ये वाढ होणार आहे. सबब, "असोलामेंढा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून पाईपलाईनद्वारे मूल तालुका, जिल्हा चंद्रपूर मधील चिंचाळा व लगतच्या ६ गावांना कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे" या कामाच्या रु.२७५६.४२ लक्ष च्या प्रस्तावास "सुधारीत प्रशासकीय मान्यता" शासन स्तरावर प्रदान करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी नियोजन विभागाचा सदर प्रस्ताव व्यय अग्रक्रम समितीपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

<u>शासन निर्णय:-</u>

वित्त विभागाकडून "असोलामेंढा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून पाईपलाईनद्वारे मूल तालुका, जिल्हा चंद्रपूर मधील चिंचाळा व लगतच्या ६ गावांना कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे" या कामाच्या रु. २७५६.४२ लक्ष च्या "सुधारीत प्रशासकीय मान्यते" बाबतचा प्रस्ताव व्यय अग्रक्रम समितीच्या दिनांक ६/९/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आला होता. दिनांक ०६/०९/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत व्यय अग्रक्रम समितीने सदर रु. २७५६.४२ लक्ष च्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार "असोलामेंढा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून पाईपलाईनद्वारे मूल तालुका, जिल्हा चंद्रपूर मधील चिंचाळा व लगतच्या ६ गावांना कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे" या योजनेच्या एकूण रुपये २७५६.४२ लक्ष (रुपये सत्तावीस कोटी, छप्पन्न लक्ष, बेचाळीस हजार फक्त) या किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेले रु. २७५६.४२ लक्ष कोटी रक्कमेपैकी खाली

दर्शविल्याप्रमाणे विविध कामासाठी रुपये २५०५.९७१७५ लक्ष (रुपये पंचवीस कोटी, पाच लक्ष, सत्त्याण्णव हजार एकशे पंचाहत्तर फक्त) व अनुषंगिक खर्च रुपये २५०.४४७१७ कोटी (रुपये दोन कोटी, पन्नास लक्ष, चव्वेचाळीस हजार, सातशे सतरा फक्त) अंतर्भूत आहेतउपशिर्षनिहाय तरतूदींचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

(रुपये लाखात)

अ.क्र.	उपशीर्ष	मूळ प्रशासकीय मान्यता	सुधारीत प्रशासकीय मान्यता
१	A - प्राथमिक कामे	२०.८८३०३	००
२	B - भूसंपादन	१.५००००	१.५००००
३	C - कामे	२०६७.२२२४५	२४९६.४७१७५
४	K - इमारती	५.०००००	५.०००००
५	O - किरकोळ बाबी	३.०००००	३.०००००
६	P - देखभाल दुरुस्ती	३१.००८३४	००
७	पाणी वापर संस्था उभारणी	५.५१२७४	००
(अ)	एकूण	२१३४.१२६५६	२५०५.९७१७५
(ब)	अनुषंगिक खर्च	२१३.४१०००	२५०.४४७१७
(क)	एकूण किंमत	२३४७.५३६५६	२७५६.४१८९२

२. चांदा ते बांदा योजनेंतर्गत "असोलामेंढा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून पाईप डिस्ट्रीब्युशन नेटवर्कद्वारे मूल तालुका जिल्हा चंद्रपूरमधील चिंचाळा व लगतच्या ६ गावांना "कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे," या कामाची उर्वरित सर्व कामे ही सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रुपये २७५६.४२ लक्ष च्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावीत; तसेच अधिक आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा कोणत्याही नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय योजनेमध्ये समावेश करण्यात येऊ नये.

३. चांदा ते बांदा योजने अंतर्गत "असोलामेंढा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून पाईपलाईनद्वारे मूल तालुका, जिल्हा चंद्रपूर मधील चिंचाळा व लगतच्या ६ गावांना कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे," या कामाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेप्रमाणे होणारा खर्च "मागणी क्रमांक ओ-७, लेखाशिर्ष ३४५१- सचिवालय आर्थिक सेवा ००, ०९० सचिवालय, (०५) चांदा ते बांदा विशेष कार्यक्रम (०५)(०१) चंद्रपूर व सिंधुदूर्ग या जिल्हयांमध्ये रिसोर्स बेस्ड इंटेन्सिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट कार्यक्रम राबविणेबाबत ३४५१A ०१९ ५३ मोठी बांधकामे" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक९८/२०१९/का.१४३४ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २३०/व्यय-१२, दिनांक ३०/८/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व व्यय अग्रक्रम समितीने दिनांक ६/९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१९०९११२०३३४०४११६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.09.13 12:09:24 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
३) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (सर्व)
४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई / नागपूर,
६) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, चंद्रपूर
८) प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, चांदा ते बांदा योजना, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) वित्त विभाग (का. व्यय-१२), मंत्रालय, मुंबई-३२.
१०) निवड नस्ती.